# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०७.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०६/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५५६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३,७१,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०६/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ११ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन एकुण १३,५५५/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.०६/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे वसमत शहर येथे ०१ व हिंगोली शहर येथे ०१ व कुरुंदा येथे ०१अशा एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ३२५०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दिनांक ०६/१२/२०२२ रोजी पोस्टे बासंबा येथे कलम ३०४(अ),३३८,२७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन मोटार सायकल क्र. ३८ ए २१२८ च्या चालकाने यातील मयत याचे मोसाला समोरून धडक दिल्याने नमुद मयत हे गंभीर जखमी झाल्याने यशोसाई हॉस्पीटल नांदेड येथे उपचार चालु असतांना दि २६.११.२०२२ रोजी मरण पावले त्यांचे मरणास नमूद मोसा चालक कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत

दिनांक ०६/१२/२०२२ रोजी पोस्टे हटटा येथे कलम ३०४(अ),२७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन क्रुझर गाडी क्र एमएच २६ के ४५४९ चा त्याच्या ताब्यातील गाडी भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन समोरा समोर धडक देवुन मुलाचे उजव्या पायाला पोटाला आणि डोळयाला गंभीर दुखापत करून मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत